वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-सोमवार दि. ७ एप्रिल २०२५ पाने ४ किंमत ३

# अखेर डॉ. सुश्रुत घैसास यांचा राजीनामा

## हॉस्पिटलची एवढी मुजोरी कशामुळे चालते हे पहावे लागेल-आ.सुरेश धस

Email.- dailydivyawarta@Gmail.com

# दिव्य वार्ता


Email.-editordivyawarta@gmail.com

## राज्य शासनाच्या अहवालात गंभीर ठपका

पुणे, (दिव्य न्युज ):६- दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात गर्भवती तनिषा भिसे यांचा उपाचाराभावी मृत्यू झाल्याचा अहवाल राज्य शासनाच्या पवार समितीने दिला आहे. त्यानंतर दीनानाथ मंगेशकर रुग्णालय आणि तनिषा भिसे यांच्या उपचारात हेळसांड करणाऱ्या डॉ. सुश्रुत घैसास यांच्यावर कारवाई करण्यात येईल असे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी म्हटले आहे. त्यानंतर काही वेळातच मंगेशकर रुग्णालयातील डॉ. सुश्रुत घैसास यांनी राजीनामा दिला आहे. डॉ. सुश्रुत घैसास यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी विविध पक्ष संघटनांकडून होत होती. आता त्यांनी स्वतः राजीनामा दिला आहे. त्यामुळे राज्य सरकार आता त्यांच्यावर कोणती कारवाई करणार याकडे लक्ष लागले आहे.

गर्भवती माता मृत्यु प्रकरणामुळे गेल्या काही दिवसांपासून पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालय चर्चेत आहे. तनिषा भिसे यांचे दीनानाथ रुग्णालयात उपचार सुरु होते. मात्र त्यांची गर्भावस्थेती त्रास सुरु झाल्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करुन घेण्याऐवजी त्यांच्यावर उपचार करणारे डॉ.

▶▶ पान २ वर




### रुग्णालयाची बदनामी आणि रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी राजीनामा?

आज दुपारी महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी राज्य शासनाने नेमलेल्या राधा किसन पवार यांच्या समितीच्या अहवालाची माध्यमांना माहिती दिली. यामध्ये त्यांनी तनिषा भिसे यांच्या मृत्यूसाठी दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रशासनच जबाबदार असल्याचा ठपका ठेवण्यात आला. त्यानंतर काही वेळातच डॉ. सुश्रुत घैसास यांनी राजीनामा दिला. रुग्णालयाची होत असलेली बदनामी आणि रुग्णांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी त्यांनी राजीनामा दिल्याचे म्हटले जात आहे. तनिषा भिसे यांच्या मृत्यूची कोणतीही जबाबदारी डॉ. सुश्रुत घैसास यांनी घेतली आहे की, नाही याबद्दल रुग्णालय प्रशासनाने अद्याप माहिती दिलेली नाही.

### ‘मी आतापर्यंत गप्प होतो पण आता नाही’-आ. सुरेश धस



पुण्याच्या दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमधून एक धक्कादायक प्रकार समोर आला होता. प्रसुतीसाठी आलेल्या महिलेच्या कुटुंबीयांकडे दहा लाख रुपयांची मागणी केली. पैशांसाठी या महिलेला दाखल देखील करून घेण्यात आलं नाही. त्यामुळे त्या महिलेचा मृत्यू झाल्याचा आरोप तिच्या कुटुंबीयांकडून करण्यात येत आहे. या घटनेनंतर राज्यभरात वातावरण चांगलंच तापलं आहे.

▶▶ पान २ वर

## समान नागरी संहिता लागू करण्याची वेळ आलीय

### केंद्र आणि राज्यांनी मिळून लवकरात लवकर कायदा करावा; हायकोर्टाची सूचना

मुंबई , (दिव्य न्युज):- देशात धार्मिक वातावरण कलुषित बनले आहे. याचदरम्यान धार्मिक समानता निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून समान नागरी संहितेची गरज कर्नाटक उच्च न्यायालयाने अधोरेखित केली आहे. देशात समान नागरी संहिता लागू करण्याची वेळ आलीय. संविधानाच्या अनुच्छेद ४४ अन्वये समान नागरी कायदा बनवण्याची नितांत गरज आहे. यासाठी केंद्र सरकार व राज्यांच्या विधानसभांनी ठोस प्रयत्न करावेत आणि लवकरात लवकर समान नागरी कायदा करावा, अशी महत्त्वपूर्ण सूचना न्यायालयाने केली आहे.

मुस्लिम समाजातील मृत महिलेच्या पती व भाऊ-बहिणींमधील संपत्ती वादात दिवाणी अपील दाखल झाले होते. त्यावर निर्णय देताना न्यायमूर्ती एच. संजीव कुमार यांच्या एकलपीठाने समान

▶▶ पान २ वर

## वक्फ कायद्याविरोधातील याचिकांवर तात्काळ सुनावणीस सर्वोच्च न्यायालयाचा नकार

मुंबई , (दिव्य न्युज):- लोकसभा आणि राज्यसभेत वक्फ सुधारणा विधेयक मंजूर झाले. त्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यावर स्वाक्षरी केल्यानंतर वक्फ सुधारणा कायदा अस्तित्वात आला आहे. पण, याला विरोध असणाऱ्या काही राजकीय पक्ष, संघटनांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. सोमवारी (७ एप्रिल) सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्याकडे याचिकांवर तात्काळ सुनावणी घेण्याची मागणी करण्यात आली. सरन्यायाधीशांनी याचिकांकर्त्यांचे कान टोचत तात्काळ सुनावणी घेण्यास नकार दिला.

कपिल सिब्बल यांनी सोमवारी जमात उलेमा ए हिंदचे अध्यक्ष मौलाना अर्शद मदनी यांच्यावतीने याचिका दाखल केली. वक्फ सुधारणा कायद्याविरोधात दाखल

▶▶ पान २ वर



## औरंगजेबांच्या कबरीभोवती १२ फूट उंच पत्र्याचे कुंपण

### भिंतीवर काटेरी ताराही, नुकसान टाळण्यासाठी केंद्राकडून खबरदारी

नवी दिल्ली, (वृत्तसेवा):- महाराष्ट्राच्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबादमध्ये असलेल्या मुघल बादशाह औरंगजेबाच्या कबरीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊ नये, यासाठी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग (एएसआय) जिल्हा प्रशासनाच्या मदतीने खबरदारीचे उपाय करीत



असल्याची माहिती केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी राज्यसभेत दिली. प्रश्नोत्तराच्या तासात शेखावत यांनी औरंगजेबाची कबर एएसआयचे एक संरक्षित स्मारक असल्याचे

▶▶ पान २ वर

## दाऊदच्या हिरवा रंग लागलेले प्रफुल्ल पटेलांसारखे दलाल संसदेत महाराष्ट्राचे नेतृत्व करतात, हे दुर्दैव



### संजय राऊत यांचा घणाघात

मुंबई , (दिव्य न्युज):-शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, खासदार संजय राऊत यांनी पत्रकार परिषद घेत वक्फ बोर्ड, प्रफुल्ल पटेल, देवेंद्र फडणवीस आणि भाजपवर हल्लाबोल केला. दाऊदशी संबंध असणारे प्रफुल्ल पटेल संसदेत महाराष्ट्राचे नेतृत्व करत आहेत, हे दुर्दैव असल्याचेते म्हणाले. भाजपने वॉशिंग मशीनमध्ये त्यांना स्वच्छ केले आहे. मात्र, त्यांचा इतिहास काढला तर त्यांना देश सोडावा लागेल, असा इशाराही त्यांनी दिला. तसेच पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात महिलेच्या झालेल्या मृत्यूवरून भाजप आणि मुख्यमंत्री फडणवीस काय करत आहेत, असा सवालही त्यांनी केला.

देशाचा सर्वात मोठा दुश्मन पाकिस्तानात बसला आहे. त्याच्याशी प्रफुल्ल पटेल यांचे संबंध आहेत. म्हणजे ते दाऊदच्या पक्षातून भाजपत गेले आहेत. भाजपत गेले कारण त्यांना त्यांची संपत्ती वाचवायची होती.तसेच तरुंगात जाण्याची भीती असल्याने प्रफुल्ल पटेल दाऊदच्या सर्व संबंधांसह भाजपत गेले. राष्ट्रीय सुरक्षेची भाषा करणाऱ्या अमित शहा यांनी त्यांना पक्षात धूवून घेतले. त्यांचे वॉशिंग मशीनने स्वच्छ केले.

▶▶ पान २ वर

## एकदा वक्फ झाले की, विषय संपला; सर्वोच्च न्यायालयाचे ३ निर्णय चर्चेत



मुंबई , (दिव्य न्युज):- लोकसभा आणि राज्यसभेत पास झाल्यानंतर वक्फ विधेयकाला राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली. त्यानंतर आता देशात वक्फ कायदा लागू झाला आहे. पण, आता या कायद्याच्या वैधानिकतेचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी, आम आदमी पक्षाचे आमदार अमानतुल्ला खान, जमियत उलेमा-ए-हिंदचे अध्यक्ष मौलाना अर्शद मदनी यांच्यासह किमान दहा व्यक्ती किंवा संघटनांनी या कायद्याविरोधात देशातील सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

याचिका दाखल करणाऱ्यांचा सर्वात महत्त्वाचा युक्तिवाद असा आहे की, हा कायदा म्हणजे सर्वोच्च न्यायालयाच्या जुन्या

▶▶ पान २ वर

## औरंगजेबांच्या वंशजाचे राष्ट्रपतींना पत्र

### ‘ती’ जागा वक्फ बोर्डाची प्रॉपर्टी

औरंगाबाद, (दिव्य न्युज):- औरंगजेबाच्या कबरीवरून महाराष्ट्रात राजकारण पेटले होते. या कबर हटवण्याची मागणी होत असताना तेथे मराठ्यांच्या शौर्याचे प्रतिक असलेले स्मारक उभारण्याची मागणी करण्यात येत आहे. त्यातच औरंगजेबाची कबर असलेली जागा कोणाची यावरून देखील वाद सुरू आहे. याबाबत स्वत:ला मुघलांचा वंशज म्हणवून घेणाऱ्या प्रिन्स याकूब हबीबुद्दीन टुसी यांनी राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांना पत्र लिहिले आहे.

▶▶ पान २ वर



## बीड, पुण्यासह राज्यभरातील १०२५ न्यायाधीशांच्या बदल्या

### हायकोर्टातून निघाला आदेश

बीड , (दिव्य न्युज):- मागील काही दिवसांपासून राज्यात आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे सत्र सुरू असतानाच आता राज्यभरातील न्यायाधीशांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. मुंबई हायकोर्टातून तब्बल १०२५ न्यायाधीशांच्या बदलीचे आदेश जारी करण्यात आले आहेत. यामध्ये पुण्या-मुंबईसह बीड व इतर न्यायालयांमधील न्यायाधीशांचाही समावेश आहे.

मुंबई हायकोर्टाचे रजिस्ट्रार जनरल समीर आडकर यांनी हे शनिवारी (ता. ५) आदेश जारी केले आहेत. राज्यभरातील विविध जिल्हा व सत्र न्यायालयांमध्ये कार्यरत जिल्हा न्यायाधीश, वरिष्ठस्तर व कनिष्ठस्तर दिवाणी न्यायाधीशांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.एकूण १०२५ बदल्यांमध्ये तब्बल २२२ जिल्हा न्यायाधीश आहेत. त्यामध्ये मुंबई, पुणे, नागपूर, बीड, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद यांसह राज्यातील विविध जिल्हा न्यायालयांमधील न्यायाधीशांचा समावेश आहे. काही न्यायाधीशांना त्याच जिल्ह्यात पोस्टिंग मिळाली आहे.पुण्यातील दहा जिल्हा न्यायाधीशांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये जे. एल. गांधी, पी. पी. जाधव, बी. पी. क्षीरसागर, ए. एम. बुक्के, आर. के. देशपांडे, एस. बी. राठोड, ए. ए. घनिवळे, एस. आर. नरवडे, एस. एन. सचदेव आणि सरिता पवार यांचा समावेश आहे.

बीडमधील सहा जिल्हा न्यायाधीशांचा समावेश आहे. बीड

▶▶ पान २ वर

## आ.संदीप क्षीरसागरांना फक्त मुस्लिम मते पाहिजे

## मुस्लिमांच्या प्रश्नावर ते कधी बोलणार ?- शेख रशिद



**बीड, (दिव्य न्युज):- बीडच्या आमदारावर मतदार संघातील मुस्लिम समाजाने भरभरून मतदान करून दुसऱ्यांना आमदार केले. पण आमदार होताच या आमदार साहेबांनी मुस्लिम समाजाच्या प्रश्नाकडे डोळेझाक केली. गेवराई तालुक्यातील अर्धमसला येथे मस्जिदमध्ये झालेल्या स्फोटा प्रकरणी आ.संदीप क्षीरसागर यांनी ब शब्दही काढला नाही. त्या ठिकाणी भेट ही दिली नाही. शासनाकडे आरोपींना सक्त शिक्षा करावी या करीता मागणीही केली नाही.**

गेल्या दोन तीन दिवसापासून वक्फ बोर्डाचा विषय देशभरात सुरू असून आप आपल्याला सेक्युलर म्हणणारे सर्वच पक्षाचे नेते या बिलाचा विरोध करत आहेत पण बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी या विषयीही ब शब्द काढलेला नाही. त्याच सोबत असे मुस्लिम समाजाचे अनेक प्रश्न असुन त्याकडे लक्ष देण्यास संदीप क्षीरसागरांना वेळ मिळत नाही का? असे पत्रक समाजसेवक शेख अब्दुल रशिद अब्दुल रज्जाक यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात केले आहे.

पत्रकात पुढे म्हंटले आहे की, संदीप क्षीरसागरांना फक्त मुस्लिम मते पाहिजेत. मुस्लिमांच्या प्रश्नावर ते बोलणार नाहीत का? आमदार साहेब एकदा तरी बोला, असाही त्यांनी पत्रकात म्हंटले आहे. बीड शहरात अनेक मुस्लिम बहुल भागात २०-२० दिवस नळाला पाणी येत नाही, स्वच्छता ही नाही याकडेही आमदार लक्ष द्यायला तयारनाहीत. फक्त प्रसिध्दीच्या झोक्यात राहुन प्रसिध्दी मिळवायची हे एकमेव काम ते करत आहेत असेही रशिद यांनी पत्रकात म्हंटले आहे.



# 'वक्फ'चा पहिला फटका महाविकास आघाडीला

उद्धव ठाकरे सोडणार काँग्रेसची साथ?


मुंबई , (दिव्य न्युज):- महाविकास आघाडीतील घटक पक्ष असेलल्या काँग्रेसला उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने पूर्णपणे पाठिंबा दिला होता. शिवसेना त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी देखील राहिली होती. त्यांची आतापर्यंतची भूमिका पाहता त्यांनी काँग्रेससोबत सर्वच मुद्द्यावरून जुळवून घेतले होते.त्यामुळे उद्धव ठाकरे वक्फ विधयेकाला विरोध करण्यासाठी काँग्रेसप्रमाणे कोर्टात जातील, असे सर्वांना वाटत होते. मात्र, आतापर्यंत वक्फ संशोधन विधेयकाला कडाडून विरोध करणाऱ्या उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने कोर्टात जाण्याच्या मुद्द्यावरून मित्रपक्ष असलेल्या काँग्रेसची साथ सोडली आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत सर्व काही आलबेल आहे का? अशी चर्चा यानिमित्ताने सुरु झाली आहे.

एकीकडे काँग्रेससह इंडियाचे आघाडीतील काही मित्र पक्षाने वक्फ संशोधन विधेयकाविरोधात सर्वोच्च न्यायालयात गेले आहेत. परंतु उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने न्यायालयात जाण्यास नकार दर्शवला आहे. त्यामुळे आता विरोधकाच्या राज्यातील महाविकास आघाडीमधील तीन पक्ष एकत्रित नाहीत का? अशी चर्चा रंगली आहे.इंडिया आघाडीतील घटक पक्ष असलेल्या आप, काँग्रेस व एमआयएमने या वक्फ विधेयकाला विरोध करीत कोर्टात जाणे पसंत केले आहे. मात्र, शिवसेनेने मात्र वक्फ विधेयकाविषयीची भूमिका दोन्ही सभागृहात मांडली आहे. त्यामुळे येत्या काळात शिवसेनेची नेमकी भूमिका काय असणार ? याची उत्सुकता लागली आहे.

वक्फ संशोधन विधेयकावर गेली दोन दिवस लोकसभा व राज्यसभेत वादळी चर्चा झाली. त्यानंतर वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक आधी लोकसभेत आणि त्यानंतर राज्यसभेत मंजूर करण्यात आले. या विधेयकावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची सही झाली. त्यामुळे या विधेयकाचे आता कायद्यात रुपांतर झाले आहे. त्यानंतर या विधेयकावरून साइड इफेक्ट जाणवण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे विरोधकांच्या आघाडीत त्याचे परिणाम जाणवू लागले आहेत.

एकीकडे काँग्रेससह इंडियाचे आघाडीतील काही मित्र पक्षाने वक्फ संशोधन विधेयकाविरोधात सर्वोच्च न्यायालयात गेले आहेत. परंतु उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने न्यायालयात जाण्यास नकार दर्शवत या मुद्द्यावरून काँग्रेसची साथ सोडली आहे. त्यामुळे आता विरोधकाच्या राज्यातील महाविकास आघाडीमधील तीन पक्ष एकत्रित नाहीत का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.वक्फ संशोधन विधेयकावर गेली दोन दिवस लोकसभा व राज्यसभेत मंजूर झाल्यानंतर आता कायदा झाला आहे. त्यानंतरही या विधयेकावरून विरोधक आणि सत्ताधारी यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरूच आहेत. त्यातच आता वक्फ कायद्यावरून महाविकास आघाडीतील घटक पक्षांपेक्षा उद्धव ठाकरे यांनी वेगळी भूमिका मांडली आहे. त्याबाबत ठाकरे यांनी रविवारी पत्रकार परिषद घेऊन त्यांची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला.

वक्फ सुधारणा विधेयकाच्या घटनात्मक वैधतेला आम आदमी पक्षाचे आमदार अमानतुल्ला खान यांच्यासह असोसिएशन फॉर दी सिव्हिल राईट्स या स्वयंसेवी संस्थेने स्वतंत्र याचिकांद्वारे सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. याआधी काँग्रेसने व एआयएमआयचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनीही सदर विधेयकाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे.मात्र, याबाबत ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी वेगळी भूमिका घेतली आहे. काँग्रेसला न्यायालयात जायचे असेल तर ते जाऊ शकतात. आम्हाला जे सांगायचे होते ते मी सांगितले आहे. यापुढे जस-जशी वेळ येईल तेव्हा तेव्हा बोलता येईल, असे उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट करीत कोर्टात जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.



त्याशिवाय उद्धव ठाकरे यांनी आपली भूमिका स्पष्ट करतानाच भाजपच्या भूमिकेबद्दल संशय व्यक्त केला आहे. 'ऑर्गनायजर' मधील एका लेखात वक्फनंतर कॅथोलिक चर्च आणि त्यांच्या संस्थांकडे असणाऱ्या सात कोटी हेक्टर जमिनीकडे वेधले आहे. वक्फ बोर्डावर आम्ही आमची भूमिका मांडली असल्याचे स्पष्ट करीत उद्धव ठाकरे यांनी या बिलाबाबत भाजपला हिंदूंचे काही घेणे देणे नाही. त्याचा छुपा अजेंडा ऑर्गनायजरने उघड केला आहे.भाजप ख्रिश्चिन समाजाकडे असणाऱ्या जमीन घेणार असल्याचा आरोप यावेळी केला. त्यामुळे येत्या काळात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची भूमिका काय असणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.



**बीड : बीडच्या जिल्हा शल्यचिकित्सक पदी डॉ.संजय राऊत यांची नियुक्ती आरोग्य विभागाने केली. त्यांनी आपल्या पदचा पदभार ही स्विकारला. आज जिल्हा रूग्णालयात पुष्पगुच्छ देवून शुभेच्छा देतांना नगरसेवक जैतुल्ला खान, समाजसेवक अब्दुल गणी बागवान व संपादक मोहंमद अबूबकर..**

## औरंगजेबाची कबर असलेल्या खुलताबादचे नामांतर होणार?

औरंगाबाद , (दिव्य न्युज):- औरंगजेबाची कबर हटवावी, अशी मागणी हिंदुत्वावादी संघटनांकडून करण्यात येत आहे. त्यावरून महाराष्ट्रात राजकारण पेटले. नागपूरमध्ये दंगल देखील झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कायद्याने कबरीला संरक्षण असल्याने ती हटवता येणार नसल्याचे सांगितले तसेच कबरीचे उदात्तीकरण होऊ देणार नसल्याचेही ठणकावले. आत्ता ज्या खुलताबादमध्ये औरंगजेबाची कबर आहे त्या खुलताबादचे नाव बदलू, अशी घोषणा मंत्री संजय शिरसाट यांनी केली.

संजय शिरसाट म्हणाले, औरंगजेबाची कबर असलेले खुलताबादचे नाव रत्नापूर होते. औरंगजेबाने ते बदलून खुलताबाद केले. देवगिरीचे नाव बदलून दौलताबाद केले. खुलताबादचे नामांतर होणार असून दौलताबादचे देखील नामांतर होणार आहे. 'संभाजीनगरचं नाव खडकी होतं. कालंतराने त्याचे नाव औरंगाबाद झालं. तसं खुलताबादचे नाव रत्नपूर होतं. कालांतराने ते खुलताबाद झाले. औरंगजेबाने त्याच्या काळात जे काही कारनामे केले आहेत त्यामुळे अनेक शहरांची नावं बदलली. धाराशीवचं नाव बदललं गेलं. नगरचं नाव बदललं गेलं. हे सगळे 'बाद' 'बाद' आहे ना त्यांची नावं बदलण्याची प्रोसेस आम्ही करतोय.', असे देखील संजय शिरसाट म्हणाले.संजय शिरसाट म्हणाले, औरंगजेबाची कबर आहे तेथे मराठ्यांचे शौर्याचे प्रतिक असलेले संभाजी महाराजांचे, शिवाजी महारांजे स्मारक उभारण्यासाठी निवेदने येत आहेत. शिवाजी महारांजे आणि संभाजी महाराजांचे स्मारक या ठिकाणी बांधण्यात येईल. औरंगजेबाने नामांतर केलेल्या सगळ्या गावांची नावं बदलणार आहोत, असा निर्धार देखील शिरसाट यांनी बोलून दाखवला.

पान १ वरून

### अखेर डॉ. सुश्रुत

सुश्रुत घैसास यांनी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना रुग्णाला दाखल करुन घेण्यापूर्वी १० लाख रुपये डिपॉझिट जमा करण्याचे सांगितले होते. तब्बल साडे पाच तास तनिषा यांना दाखल करुन घेण्यासाठी त्यांचे नातेवाईक रुग्णालय प्रशासनाला विनंती करत होते. उपचारांआभावी अखेर दोन जुळ्या मुलींना जन्म देऊन तनिषा भिसे यांचा मृत्यू झाला.

मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा - आमदार अमित गोरखे

माता मृत्यूच्या या घटनेसाठी दीनानाथ मंगेशकर धर्मदाय रुग्णालयाचे प्रशासन आणि डॉ. सुश्रुत घैसास हेच जबाबदार असल्याचा आरोप मृत तनिषा भिसे यांच्या नातेवाईकांनी केला. तसेच भाजपचे विधान परिषदेतील आमदार अमित गोरखे यांनी डॉ. सुश्रुत घैसास यांच्यासह संबंधीत डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करुन त्यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

तनिषा भिसे यांचा मृत्यू नाही तर हत्या - सुप्रिया सुळे

दरम्यान, तनिषा भिसे मृत्यु प्रकरणात हॉस्पिटलची चुक आहे हे अहवालातून दिसून आले आहे तेव्हा आता हॉस्पिटल आणि डॉक्टरांवर हत्येचा गुन्हा दाखल करा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. त्यांनी आज तनिषा भिसे यांच्या कुटुंबियाची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. त्यानंतर त्या माध्यमांशी बोलत होत्या.

### 'मी आतापर्यंत गप्प होतो पण

तनिषा भीसे असं या मृत महिलेचं नाव आहे. तनिषा भीसे या भाजपचे आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहायक असलेल्या सुशांत भिसे यांच्या पत्नी आहेत. रुग्णालयाच्या मनमानीमुळे मृत्यू झाल्याचा आरोप तनिषा भीसे यांच्या कुटुंबाकडून करण्यात येत आहे. मात्र दुसरीकडे रुग्णालयाकडून या आरोपांचं खंडन करण्यात आलं आहे. घडलेल्या या प्रकारानंतर आता रुग्णालय प्रशासनाकडून मोठा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार आता इथून पुढे कोणत्याही रुग्णाकडून अनामत रक्कम घेतली जाणार नाहीये. दरम्यान या घटनेवर आता भाजप आमदार सुरेश धस यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. ही दुर्दैवी घटना असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

दवाखान्यातील बिलाच्या प्रकरणात मी वेळोवेशी विधानसभेत विषय मांडलेला आहे. मात्र हॉस्पिटलची एवढी मुजोरी कशामुळे चालते हे पाहावे लागेल. आमदारांच्या जवळच्या व्यक्तीच्या पत्नीचा असा मृत्यू होत असेल तर हे दुर्दैव आहे. या प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जी समिती नेमली आहे, ती योग्य कारवाई करेल.

आजपर्यंत आम्ही गप्प होतो, परंतु आमच्या आमदारांच्या पीएसोबत अशा प्रकारची घटना घडल्यानंतर आता कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी यावेळी सुरेश धस यांनी केली आहे. दरम्यान लॉरेन्स बिश्नोई संदर्भात कुठलंही यावेळी बोलणं झालं नाही, त्यावर मी मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली नाही. मी माझ्या वैयक्तिक कामासाठी आलो होतो, लॉरेन्स बिश्नोई संदर्भात आम्ही मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून ते म्हणतील तिथे गुन्हा दाखल करणार आहोत, असंही यावेळी सुरेश धस यांनी म्हटलं आहे.

### समान नागरी

नागरी संहितेच्या अंमलबजावणीबाबत भाष्य केले. सर्व नागरिकांसाठी, विशेषतः महिलांसाठी समानतेचे धोरण, धर्मनिरपेक्षता आणि न्यायाच्या संवैधानिक दृष्टिकोनातून समान नागरी संहिता महत्त्वपूर्ण आहे. याचा केंद्र सरकार आणि राज्यांनी गांभीर्याने विचार करावा व समान नागरी कायदा लागू करण्यासाठी ठोस प्रयत्न करावेत, असे मत न्यायमूर्ती संजीव कुमार यांनी व्यक्त केले. गोवा आणि उत्तराखंड यांसारख्या राज्यांनी आधीच समान नागरी संहिता लागू करण्याच्या दिशेने पावले टाकली आहेत, असे नमूद करीत न्यायालयाने आपल्या आदेशपत्राची प्रत केंद्र सरकार व कर्नाटक सरकारच्या प्रधान विधी सचिवांना पाठवण्याचे निर्देश रजिस्ट्रार जनरलना दिले.

डॉ. आंबेडकर, सरदार पटेल यांच्या भाषणांचा संदर्भ

समान नागरी संहितेच्या समर्थनार्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार वल्लभभाई पटेल आदी थोर नेतेमंडळींनी दिलेल्या भाषणांचा संदर्भ न्यायालयाने दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद, टी. कृष्णमाचारी आणि मौलाना हसरत मोहानी यांच्यासारख्या प्रतिष्ठत नेत्यांनी राष्ट्रीय एकात्मता आणि समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी समान नागरी कायद्यांचे वेळोवेळी समर्थन केले, असे न्यायमूर्ती संजीव कुमार यांनी म्हटले आहे.

न्यायालयाचे निरीक्षण

देशाला 'पर्सनल लॉ' आणि धर्माबाबत समान नागरी संहिता आवश्यक आहे, तरच संविधानाच्या अनुच्छेद १४ चे उद्दिष्ट साध्य होईल. न्याय, समानता, धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकात्मता ही संविधानाची मूल्ये सामाजिक जीवनात साकार होतील. संविधानानुसार स्त्री -पुरुष समान नागरिक आहेत. पण प्रत्यक्षात धर्मांवर आधारित 'पर्सनल लॉ'मुळे महिलांना भेदभावाची वागणूक दिली जाते.हिंदू कायदा वडिलोपार्जित मालमत्तेत मुलींना समान हक्क देतो, मात्र मुस्लिम पर्सनल लॉमध्ये भाऊ आणि बहिणींमध्ये भेदभाव केला जातो. हा भेदभाव थांबवण्याची वेळ आली आहे.

### वक्फ कायद्याविरोधातील

करण्यात आलेल्या याचिका एकत्रित करण्याची मागणी केली.सुनावणीवेळी सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी सिब्बल यांना प्रश्न विचारला की, 'ईमेलद्वारे तात्काळ सुनावणी करण्याची प्रक्रिया आहे, मग मौखिक पद्धतीने याचा उल्लेख का केला जात आहे?' सरन्यायाधीशांनी सिब्बल यांना मेन्शनिंग लेटर सादर करण्यास सांगितले.

सरन्यायाधीशांना तात्काळ सुनावणीस का दिला नकार?

मेन्शनिंग लेटर आधीच सादर करण्यात आले आहे, अशी माहिती सिब्बल यांनी सरन्यायाधीशांना दिली. त्यावर सरन्यायाधीश संजीव खन्ना म्हणाले की, 'मी दुपारनंतर ते तपासून घेईन आणि त्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करेन.'

'सर्वच महत्त्वाची प्रकरणे दुपारनंतर माझ्यासमोर ठेवली जातील. जर आपल्याकडे एक प्रक्रिया आहे, तर मग तुम्ही मौखिक पद्धतीने याचा उल्लेख का करत आहात? हे प्रकरण दुपारनंतर माझ्यासमोर ठेवलं जाईल. तेव्हा मी आवश्यक कार्यवाही करेन', असे उत्तर देत सरन्यायाधीशांनी याचिकांवर तात्काळ सुनावणी करण्यास नकार दिला.

तीन याचिका आधीच दाखल

वक्फ सुधारणा कायद्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात तीन याचिका अगोदरच दाखल केल्या गेल्या आहेत. केरळातील जमीयत उलेमाने ६ एप्रिल रोजी या कायद्याला आव्हान दिले आहे. तर आपचे आमदार अमानतुल्लाह खान, काँग्रेसचे खासादर मोहम्मद जावे आणि असोसिएशन फॉर प्रोटेक्शन सिव्हील राइट्स यांच्याकडून इतर तीन याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत.

### औरंगजेबाच्या कबरीभोवती

सांगून याचा तपशील एएसआयच्या वेबसाइटवर उपलब्ध असल्याचे नमूद केले.

औरंगजेबाची कबर एएसआयच्या कक्षेतील संरक्षित स्मारक आहे का आणि असेल तर या तपशिलाचा उल्लेख एएसआयच्या वेबसाइटवर केला आहे का?. कबरीचे नुकसान होण्याचा धोका आहे हे एएसआयला ज्ञात आहे का आणि असेल तर याच्या सुरक्षेसाठी कोणती पावले उचलली आहेत, अशी विचारणाही करण्यात आली होती.

अशा असतील उपाययोजना

या संरक्षित स्मारकाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊ नये म्हणून एएसआय सातत्याने जिल्हा प्रशासनाशी समन्वय साधून पावले उचलत आहे. यात मकबऱ्याच्या चारही बाजूला १२ फूट उंच पत्र्याचे कुंपण लावणे, अतिक्रमण करणाऱ्यांना अटकाव व्हावा म्हणून कबरीच्या शेजारील भिंतींवर काटेरी तारा लावणे. मल्टि टास्किंग स्टाफसोबतच खासगी सुरक्षा रक्षक तैनात करून याची एएसआय अधिकाऱ्यांमार्फत नियमित निगराणी करणे यासाठी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग प्रयत्न करणार असल्याचे सांगण्यात आले.

### दाऊदचा हिरवा रंग

असे प्रफुल्ल पटेल संसदेत आहेत. याची लाज वाटते. दाऊदचे हस्तक भाजपने आपल्या पक्षात घेतले आणि हे दुसऱ्यांना निष्ठेच्या गोष्टी सांगत आहेत, असा शब्दांत त्यांनी पटेल यांना सुनावले.

अजित पवार यांनी प्रफुल्ल पटेल यांना पक्षात घेऊन स्वतःचे अवमूल्यन करून घेतले आहे. प्रफुल्ल पटेलसारखे लोकं कोणाचेही नसून ते दलाल आहेत. कधी काँग्रेसची दलाली करत होते, दाऊदची दलाली करत होते. त्यानंतर स्वतःला वाचवण्यासाठी भाजपमध्ये गेले. असे लोकं संसदेत आहे. त्यांची संसदेत बोलण्याची लायकी आहे का, आधी भाजपने स्वतःचे रंग पाहावेत. त्यांना दाऊदचा हिरवा रंग लागलेला आहे. ते वफ्फवर बोलत आहेत. तसेच प्रफुल्ल पटेल यांनी आपल्या नादाला लागू नये, असेही त्यांनी ठणकावले.ते भाजपला चमचेगिरी करून दाखवत होते. अशी माणसे महाराष्ट्राचे शत्रू आहेत. ते आपण निष्ठेचा पुतळा असल्याचे दाखवत होते. त्यांचा सगळा इतिहास काढला तर त्यांना देश सोडावा लागेल असा इशाराही त्यांनी दिला. फडणवीस, मोदी, शहा यांच्यासमोर वाकलेले हे लोकं आहेत. त्यांना पाठीचा कणा नाही. हे महाराष्ट्राचे नेतृत्व संसदेत करत आहेत. अशा लोकांना भाजप खाद्यांवर घेऊन फिरत आहे. भाजपनेही आपली लायकी दाखवून दिली आहे. दाऊदचा आरोप पंतप्रधान मोदी यांनीच केला आहे. कुछ लोग मिर्चीका व्यवहार करते है और कुछ लोकं मिर्चीसे व्यवहार करते है., हे वक्तव्य मोदी यांचे आहे. या लोकांनी नंतर भाजपची चाटूगिरी करत आरोप धूवून काढण्याचा प्रयत्न केला.

दाऊदशी संबंध, इक्बाल मिर्चीची संबंध, बॉम्बस्फोटाच्या आरोपांशी संबंध, हेआरोप आहेत त्यांच्यावर. आता ईडीने क्लीनचीट दिली, असे ते सांगितील. मात्र, ही क्लीनचीट कशी मिळाली,हे जनतेला माहिती आहे. त्यांनी आमच्या रंगावर बोलू नये, असेही संजय राऊत म्हणाले. भ्रष्टाचाऱ्यांना पक्षात घेत भाजपने बहुमत मिळवले आहे. वफ्फच्या जमिनी बळकावण्यासाठीच हे सर्व सुरू आहे. आम्ही या भ्रष्टाचाराविरोधात आहोत. या जमिनी कोणाकडे जातात, हे जनतेला लवकरच कळेल. जे दाऊदच्या जमिनी घएऊ शकतात, ते वक्फच्या जमिनीही बळकावणार आहेत, असेही संजय राऊत यांनी म्हटले. सरकारला वफ्फ बोर्डाच्या जमिनीची चिंता आहे. मात्र, चीनने अतिक्रमण केलेल्या जमिनीची चिंता नाही. कश्मीरी पंडितांच्या जमिनीची त्यांना चिंता नाही, याकडे सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.भाजपच्या कार्यकर्त्यांच्या पत्नीसाठी रुग्णालयात फोन केल्याचे सांगितले जात आहे. मात्र, भिसे कुटुंबावर संकट ओढवले आहे. एका मातेचा करुण अंत झाला आहे. तर देवेंद्र फडणवीस सरकारला १०० दिवस झाले म्हणून भविष्याचा वेध घेत बसले आहेत. गोरगरिबांची, सर्वसामान्यांची कामे ही फडणवीस यांची नाहीत. त्यांची लेव्हल खूप वरची आहे. शेतकरी,सर्वसामान्य तडफडून मरत आहेत आणि योजना फक्त कागदावरच आहेत. मिंधे आणि अजित पवार फक्त पोपटपंची करत फिरत आहेत. अदानी, अंबानी, टाटा, बिर्ला यांची कामे ही फडणवीस यांची आहे. फडणवीस यांची ही लेव्हल आहे, असा टोलाही संजय राऊत यांनी हाणला. मंत्रालयात बसून दम देणे सोपे आहे. मात्र, राज्यात अराजक आणि बजबजपुरी माजली आहे, याची फडणवीस यांना जाणीवही नाही. ते मोदींचे भजन करत आहेत. योदनांची स्वप्ने दाखवत आहे.

महाराष्ट्रात सर्वसामान्य माणासाकडे २० लाख रुपये मागितले जातात. सर्वसामान्य माणसाकडे २० लाख रुपये कसा असतील. हा अदानी, अंबानी यांचा महाराष्ट्र नाही. हा सर्वसामान्य आणि गोरगरिबांचा महाराष्ट्र आहे. आता फडणवीस यांच्यामध्ये हिंमत असेल तर रुग्णालयावर कारवाई करावी. भिसे कुटुंब ज्या डॉक्टरचे आणि संबिधतांचे नाव घेतात. त्यांच्यावर कारवाई करून दाखववी. फक्त विरोधी पक्षांच्या नेत्यांवर कारवाई करण्यातच त्यांचे काम चालते. त्यांची लेव्हलच वेगळी असल्याने त्यांना राज्यात काय सुरू आहे, ते माहिती नाही. नागपूरात गोळीबार झाला, हे देखील त्यांना माहिती नाही, असेही ते म्हणाले.

### एकदा वक्फ झाले की,

निर्णयांचे उल्लंघन आणि मुस्लिमांचे मूलभूत आणि धार्मिक अधिकार हिरावून घेण्याचे षडयंत्र आहे. याचिकाकर्ते पुन्हा पुन्हा सर्वोच्च न्यायालयाच्या त्या टिप्पणीचा पुनरुच्चार करत आहेत, ज्यात एससीने म्हटले होते- 'एकदा वक्फ झाले की, विषय संपला.' दरम्यान, वक्फबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेले तीन निर्णय महत्त्वाचे आहेत.

१९५४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय देशातील धार्मिक स्वायत्ततेचे महत्त्व अधोरेखित करणारा होता. या निर्णयात न्यायालयाने १९५० च्या बॉम्बे पब्लिक ट्रस्ट कायद्यातील काही तरतुदी घटनाबाह्य ठरवल्या होत्या. धर्मनिरपेक्ष संस्थेला धार्मिक मालमत्तेचे नियंत्रण देणे, हे त्या विशिष्ट धर्माच्या लोकांच्या धार्मिक आणि मालमत्ता अधिकारांवर अतिक्रमण आहे, असे न्यायालयाने तेव्हा म्हटले होते. हा निर्णय आधार मानून वक्फ मालमत्तेवर सरकारचे नियंत्रण वाढवणे आणि त्यात मोठ्या प्रमाणावर तपासाची व्यवस्था करणे, हे १९५४ च्या या निर्णयाचे उल्लंघन आहे, असा युक्तिवाद सर्वोच्च न्यायालयात केला जात आहे.

१९९८ च्या या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने वक्फला इस्लाम धर्माअंतर्गत धर्मादाय करण्याची पद्धत मानली होती. ही व्यवस्था कुराणातून आल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले होते. या निर्णयात न्यायालयाने वक्फचा वारसा मान्य केला होता. मुस्लीम कायद्यांमध्ये वक्फ हे पवित्र आणि धार्मिक स्वरूपाचे दान असल्याचे न्यायालयाने म्हटले होते. न्यायालयाने वक्फ कायमस्वरुपी मानला होता. वक्फ संपत्ती घोषित झाल्यानंतर ती वक्फच राहील, असे न्यायालयाने तेव्हा म्हटले होते.

ही बाब आंध्र प्रदेश सरकारी कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वयाशी संबंधित होती. त्याचा थेट वक्फशी संबंध नव्हता, पण त्याचा आधार नक्कीच बनवला जात होता. मूळ कायद्याचा उद्देश निष्प्रभ ठरणाऱ्या अशा कोणत्याही सुधारणा घटनाबाह्य मानल्या जातील, असे सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयात म्हटले होते. आता न्यायालयात असा युक्तिवाद केला जात आहे की, नवीन कायद्यातील किमान ३५ दुरुस्त्या १९९५ च्या वक्फ कायद्यातील तरतुदींच्या वास्तविक उद्देशाचे उल्लंघन करत आहेत.

### औरंगजेबाच्या वंशजाचे

याकूब हबीबुद्दीन टुसी हे स्वतःला शेवटचे मुघल बादशहा शाह जाफर यांच्या सहाव्या पिढीतील असल्याचे सांगतात. त्यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, 'माझे पूर्वज औरंगजेबाची कबर ही संभाजीनगर जिल्ह्यात आहे. त्यांच्या इच्छेनुसार ही अत्यंत साधी कबर आहे. औरंगजेब यांचा जन्म भारतात झाला आणि ते भारतातच मेले.काही दिवसांपासून ही कबर उखडण्याची मागणी होत आहे.''भारतीय राज्यघटनेनुसार प्रत्येक माणसाला या देशात राहण्याचा आणि इथेच मरण्याचा अधिकार आहे. औरंगजेबाच्या कबरची मी संरक्षक आहे. माझी राष्ट्रपतींना विनंती आहे की केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांनी या कबरीचे संरक्षण करावे.', असे याकूब हबीबुद्दीन टुसी यांनी म्हटले आहे.

'औरंगजेबाची कबर असलेल्या जागेविषयी, प्रॉपर्टीविषयी वेगवेगळे दावे केले जात आहे. मात्र, ही जागा भारतीय पुरातत्त्व विभागाच्या अधिपत्याखाली असून ती वक्फ बोर्डाची प्रॉपर्टी आहे. काही लोक इतिहासाची मोडतोड करत आहे आणि दोन समाजात वाद लावण्याचा प्रयत्न करत हे सरकारने हाणून पाडले पाहिजेत', असे देखील याकूब हबीबुद्दीन टुसी यांनी म्हटले आहे.

औरंगजेबाची कबर ज्या खुलताबादमध्ये आहे त्या खुलताबादचे नामांकरण करू, असे वक्तव्य मंत्री संजय शिरसाट यांनी केले आहे. शिरसाट म्हटले की, खुलताबादचे नाव रत्नापूर होते मात्र त्याचे नामांतर करण्यात आले. आता सरकार म्हणून आम्ही मुघल काळात नाव दिलेल्या सर्व गावांची नावं बदलणार आहेत.

### बीड, पुण्यासह

कोर्टातील एस. आर. पाटील, के. आर. जोगळेकर, अंबाजोगाई न्यायालयातील डी. डी. खोचे, एस. जे. घरत, केज न्यायालयातील के. डी. जाधव आणि माजलगांव न्यायालयातील बी. जी. धर्माधिकारी या न्यायाधीशांचा समावेश आहे.दिवाणी वरिष्ठ स्तरातील ३३१ आणि कनिष्ठ स्तरातील ४७२ न्यायाधीशांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्येही बीड जिल्ह्यातील काही न्यायाधीशांचा समावेश आहे. हायकोर्टाकडून १९४ न्यायाधीशांना बढती देण्यात आली आहे. त्यामध्ये बीड जिल्ह्यातील एकाही न्यायाधीशांचा समावेश नाही. बीडप्रमाणेच इतर जिल्ह्यांमधील न्यायाधीशांच्याही बदल्या करण्यात आल्या आहेत.